- 9 OCT 2023

आरडंट व्ह्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंगसमोरील समस्या कमी होतील: डॉ. उदय जोशी यांचा आशावाद

कोल्हापूर : सहकार क्षेत्राने गेल्या काही वर्षांत अनेक चढउतार अनुभवले असले तरी नजीकच्या कालखंडात सहकारी बँकिंग क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील, असा आशावाद नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज् लिमिटेड तथा 'नॅफकब'चे संचालक डॉ. उदय जोशी यांनी काल येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सहकारी बँकांची भविष्यातील वाटचाल' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे, संजय परमणे प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. उदय जोशी. मंचावर (डावीकडून) डॉ. राजन पडवळ, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व वैशाली आवाडे.

डॉ. उदय जोशी म्हणाले, देशात बँकांच्या वाढीला मोठी संधी आहे. सहकारी बँकांचे देशातील प्रमाण अवघे ३ टक्के आहे. त्यांनाही वाढीची संधी आहे. मात्र, त्यांची सेंद्रिय वाढ झालेली नाही. गेल्या तीनेक वर्षांत आम्ही सहकारी बँकांच्या वतीने धोरण बदलासाठी म्हणून रिझर्व्ह बँकेकडे खूप रदबदली केली आहे. या बँकांवरील नियंत्रण, नियमन प्रणाली अधिक सक्षम करा, पण परवानगी द्या, असा आग्रह धरला. परिणामी, रिझर्व्ह बँकेने आता सहकारी बँकांच्या अनुषंगाने धोरणात्मक लवचिकता स्वीकारली आहे. धोरणांमध्ये बँकेने अनेक सकारात्मक बदल केल्याचे जाणवते आहे. आपण आपले म्हणणे योग्य पद्धतीने मांडल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. त्यातूनच आज सहकारी बँकिंगसाठी पोषक परिस्थिती निर्माण होताना दिसते आहे. नजीकच्या काळात आणखी चांगले बदल दिसतील आणि या क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सहकार क्षेत्राला ऊर्जितावस्था आणण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले, सहकारी बँकांनी आधुनिकतेची कास धरीत डिजीटल सुविधा उपलब्धतेच्या दिशेने जायला हवे. रिझर्व्ह बँकेच्या या संदर्भातील धोरणांचाही संशोधनात्मक अभ्यास गरजेचा असून या विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर सातत्यपूर्ण चर्चा होणे लाभदायी ठरेल.

यावेळी वैशाली आवाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

आरडेंट व्ह्यू




# शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवनात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी, विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त सामूहिक शपथही घेण्यात आली.

यावेळी अधिष्ठाता डॉ.सरिता ठकार, डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ.जगदीश सपकाळे, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.तानाजी चौगुले, डॉ.रविंद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ.नेहा वाडकर, डॉ.जयश्री कांबळे, दौलत नांद्रे यांचेसह संशोधक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

- 9 OCT 2023

जनसंपर्क कक्ष

आउटडंट व्ह्यु

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. त्याच बरोबर मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.



यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कैलास सोनावणे, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सरलाताई पाटील, भूगोल अधिविभागाचे डॉ. एस.के. पवार, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. जे.बी. सपकाळे, डॉ. पी.टी. पाटील, डॉ. मीना पोतदार, डॉ. अभिजीत पाटील, सुनिल जाधव यांच्यासह संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

- 9 OCT 2023

आरडंट व्ह्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांचेकडून शरण साहित्य अध्यासनासाठी एक लाखाचा निधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू होणाऱ्या शरण साहित्य अध्यासनाकरिता आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी एक लाख रुपयांचा प्रथम निधी प्रदान केला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दि. २५ मार्च २०२३ रोजी झालेल्या अधिसभेमध्ये विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. सदस्य अभिषेक मिठारी यांनी हा ठराव मांडला होता. या शरण साहित्य अध्यासनाकरिता लोकवर्गणी जमा करण्याचे आवाहन कोल्हापूर लिंगायत समाज संस्थेने केले होते. संस्थेच्या या आवाहनाला तत्परतेने प्रतिसाद देत आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्याकडून १ लाख रुपयांचा प्रथम निधी देणगी स्वरूपात देण्यात आला. सदरचा निधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे आज सरलाताई पाटील यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांचेकडून शरण साहित्य अध्यासनासाठी प्राप्त एक लाख रुपयांचा निधी सुपूर्द करताना सरलाताई पाटील. सोबत अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे आदी.

यापूर्वी एप्रिल २०२३मध्ये शरण साहित्य अध्यासनासाठी कोल्हापूर बसव केंद्रातर्फे विद्यापीठास अकरा हजार रुपयांची शरण साहित्य ग्रंथसंपदा भेट देण्यात आली आहे. आज निधी प्रदान प्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे आदी उपस्थित होते.

- 9 OCT 2023

आरडंट व्ह्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या आवाजाचा प्रतिध्वनी शिक्षकांच्या मनात उमटला पाहिजे - डॉ. ज्ञानेश्वर मुळे

कोल्हापूर : शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि इंग्लिश मिडियम स्कुल, असोसिएशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने EDUREFORM² प्रकल्पातंर्गत माध्यमिक शिक्षकांसाठी नावीन्यपूर्ण अध्यापन पध्दतींचे प्रशिक्षण दि.२५.०९.२०२३ ते २७.०९.२०२३ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. EDUREFORM² हा युरोपिअन युनियन चे अर्थसहाय्य असलेला प्रकल्प शिक्षणशास्त्र विभागात सुरू आहे चौथ्या औद्योगिक क्रांतीचे भारतीय शिक्षण पध्दतीवर होणारा परिणाम अभ्यासणे हे या प्रकल्पाचे ध्येय आहे. सबंधित कार्यक्रमात १० नावीन्यपूर्ण अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी डॉ. ज्ञानेश्र्वर मुळे, सदस्य मानव अधिकार अयोग, नवी दिल्ली. हे प्रमुख पाहुणे म्हणुन लाभले होते. त्यांनी शिक्षकी पेशा हे पवित्र काम आहे व विद्यार्थ्यामध्ये आपुलकीची भावना शिक्षकांनी पसरवली पाहिजे असे मत मांडले. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनातील प्रतिध्वनी शिक्षकांच्या मनात उमटला पाहिजे तरच शिक्षण अर्थपूर्ण होईल, असे मत त्यांनी मांडले. या प्रशिक्षणासाठी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी.एस.पाटणकर, डॉ. वि.सं.खंडागळे, इनोवेशन मॅनेजर डॉ. जी.एस.जोशी व अधिविभागातील शिक्षक आणि इंग्लिश टिचर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. नितीन नायकवडे व महेश पोळ तसेच सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

- 9 OCT 2023
आउटलेट व्ह्यू

# स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे १५ विद्यार्थी पीएच.डी.सह उच्चशिक्षणासाठी परदेशी

## आजपर्यंत सुमारे ९० विद्यार्थी गेले परदेशी; विभागाची दशकभरातील कामगिरी

कोल्हापूर, दि. २२ सप्टेंबर: शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी पीएच.डी.सह विविध अभ्यासक्रमांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील अनेक विद्यार्थी दर वर्षी भरघोस फेलोशीपसह सह पीएच.डी. तसेच आधुनिक विषयांच्या अभ्यासासाठी परदेशात जातात. सन २०१२-१३ मध्ये सुरु झालेल्या या नव्या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी.च्या संशोधनासाठी तर दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी आणि पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशातल्या नामांकित व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांमध्ये गेले आहेत. त्यांना भरघोस विद्यावेतनही मिळाले आहे. अवघ्या दशकभराच्या वाटचालीमध्ये विभागाने हे यश प्राप्त केले आहे.

यंदाच्या वर्षी देखील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे ११ विद्यार्थी पीएच.डी. साठी, दोन विद्यार्थी पोस्ट-डॉक्टरेट रिसर्चसाठी तर दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड तसेच दक्षिण कोरिया या देशांमधील नामांकित विद्यापीठांकडे रवाना झाले आहेत.

या विद्यार्थ्यांची नावे व कंसात देश पुढीलप्रमाणे- पीएच.डी.: प्रज्ञा पाटील, अभिषेक कुलकर्णी (ऑस्ट्रेलिया), भक्ती जाधव, अंकिता निकम, आदर्श पाटील, आशिष कणसे, रोहन हगवणे, अभिषेक चव्हाण, योगेश डांगे, ओंकार पाटील, (दक्षिण कोरिया), अपूर्वा वडणगेकर (झेक रिपब्लिक). पोस्ट डॉक्टरल रिसर्च: डॉ. सोमनाथ कुंडले, डॉ. स्नेहल पाटील (दक्षिण कोरिया). पदव्युत्तर पदवी: वैभवी जाधव (जर्मनी), विनायक निर्मळे (इंग्लंड).

या विद्यार्थ्यांना स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा यांच्यासह प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

- 9 OCT 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेटी बचाओ चळवळ देशभर पोहोचेल : डॉ. डी. टी. शिर्के

## किसनराव कुराडे यांच्या दहा पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रा. किसनराव कुराडे-पाटील लिखित चिंगीचा माइंडसेट, भ्रूणकन्येचा आत्मध्वनी, चिंगीची भरारी, बिटिया का जीवनदान पत्र, आई... दार उघड.... आदी पुस्तकांच्या माध्यमातून प्रा. कुराडे यांनी बेटी बचाओ अभियान राबविण्यासाठी खऱ्या अर्थाने योगदान दिले आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून ही लोकचळवळ केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर पोहोचेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी व्यक्त केला.




शिवाजी विद्यापीठात शनिवारी प्रा. किसनराव कुराडे पाटील लिखित दहा पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शोभा पवार, प्रा. किसनराव कुराडे पाटील, युवराज कदम उपस्थित होते.

स्वयंभू यशवंतराव घाटगे संस्थानिक शाहू महाराज झाले नसते, तर...!!, गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार काळ आणि कर्तृत्व, आत्मदर्शन, व्ही. टी. पाटील काळ आणि कर्तृत्व, जीवनदान यज्ञ आदी दहा पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, शिवराज विद्या संकुल व वाचनकट्टा बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्तपणे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. किसनराव कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ हे महिलांच्या बाबतीतील धोरणे विकसित करण्यासाठी उपक्रम राबवत असून, महिला धोरण बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. जी. पी. माळी, हसन देसाई, सिध्दार्थ लाटकर, श्याम कुरळे, डॉ. प्रा. सुनील देसाई उपस्थित होते. उज्ज्वला पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# 'गांधीजींच्या शाश्वत विकासाच्या विचारानेच भारत महासत्ता बनेल'

कोल्हापूर : एकविसाव्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचाराचे महत्त्व आहे, त्यांनी सांगितलेल्या शाश्वत विकासानेच भारत महासत्ता बनेल, असे प्रतिपादन कडेगाव येथील बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक संजय ठिगळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विषय व प्लेसमेंट सेल यांच्या वतीने आयोजित 'महात्मा गांधींच्या संकल्पनेतील भारत व शाश्वत ग्रामीण विकास' या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे, एस. डी. भोसले, समन्वयक डॉ. एस. व्ही. माने, डॉ. के. बी. पाटील, प्रा. एन. एस. रणदिवे डॉ. एस. एल. गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

लोकमत

# अरुण शिंदे यांचे आज व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहात आज, सोमवारी सकाळी ११ वाजता सत्यशोधक चळवळीचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान या विषयावर नाईट कॉलेजच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे यांचे व्याख्यान होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागामार्फत सत्यशोधक श्री कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत सत्यशोधक समाजाचावर व्याख्यान होणार आहे. याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असून, प्रा. अनिल भीमराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रा. डॉ. प्रतिमा पवार आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

पुढारी

# 'सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सव' वर्षानिमित्त आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त सोमवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रा. डॉ. अरुण शिंदे 'सत्यशोधक चळवळीचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी केले आहे.

- 9 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कागलच्या माने महाविद्यालयाला विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठ महिला फुटबॉल; कमला महाविद्यालय उपविजेते

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या महिला आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत कागलच्या माने महाविद्यालयाने कोल्हापूरच्या कमला महाविद्यालयाला टायब्रेकरमध्ये ४-३ असे नमवून विजेतेपद पटकाविले. पेनल्टीचे दोन फटके अडविणारी माने महाविद्यालयाची गोलरक्षक अर्पिता पोवार विजयाची शिल्पकार ठरली. तृतीय क्रमांकाच्या सामन्यात कोल्हापूरच्याच न्यू कॉलेजने बाजी मारली. येथील शिवराज महाविद्यालयाने या स्पर्धेचे संयोजन केले होते. स्पर्धेत सहा संघांनी सहभाग घेतला होता.



**गडहिंग्लज :** आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेतील विजेत्या माने महाविद्यालयाला करंडक देताना बीना कुराडे. सोबत जोत्सा शिंदे, एन. आर. कांबळे, श्रीनिवास पाटील, धनंजय पाटील, जयवंत पाटील आदी.

चुरशीच्या अंतिम सामन्यात माने महाविद्यालयाने टायब्रेकरमध्ये कमला महाविद्यालयाला ४-३ असे नमविले. निर्धारित वेळेत सामना १-१ बरोबरीत होता. सामन्याच्या पूर्वार्धात मानेच्या तनुजा चौगुले हिने, तर कमलाच्या आर्या मोरेने उत्तरार्धात बरोबरीचा गोल नोंदविला. टायब्रेकरमध्ये मानेच्या जुलेखा बिजली, सोनाली सुतार, नीशा पाटील, शाहीन मुल्लाणी यांनी, तर कमलाच्या सानिका पाटील, राजनंदिनी भोईटे, समृध्दी काळे यांनी गोल केले. न्यू कॉलेजने आष्ट्याच्या अण्णासाहेब डांगे महाविद्यालयावर मात करून तिसरा क्रमांक पटकाविला.

शिवराजच्या प्रा. बिनादेवी कुराडे, हॉकीच्या माजी राष्ट्रीय खेळाडू जोत्स्ना शिंदे यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक देऊन गौरविण्यात आले. यावेळी निवड समिती अध्यक्ष डॉ. एन. आर. कांबळे, डॉ. दीपक डांगे, डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते. स्पर्धा निरीक्षक म्हणून डॉ. श्रीनिवास पाटील यांनी काम पाहिले. प्रा. राहुल मगदूम यांनी स्वागत केले. प्रा. दीपिका खांडेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जयवंत पाटील यांनी आभार मानले. सचिन बारामती, गणपत हुलसार, किरण कावणेकर, महेश जगताप, राकेश परीट यांनी पंच म्हणून काम पाहिले.

### विजेतेपदाची हॅट्‌ट्रिक

जिल्ह्यात फुटबॉल म्हणजे कोल्हापूर शहर आणि गडहिंग्लज अशीच ओळख. पण, अलिकडे कोल्हापूरच्या महिला संघाला चितपट करीत कागलच्या माने महाविद्यालयाने लक्षवेधी यश मिळविले आहे. विजेतेपदाची हॅट्‌ट्रिक करून माने महाविद्यालयाने वर्चस्व अधोरेखित केले.